संचिका दाखल तारीख          २१.०४.२०१२
संचिका नोंदणी तारीख          २५.०४.२०१२
संचिका निकाल तारीख          ०७.०२.२०१८
कालावधी          ०५ वर्ष ०९ म. १७ दि.

**गंगापूर ता. गंगापूर येथील सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांच्या न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी – भागवत तु. झिरपे )

**नियमित दिवाणी दावा क्रं. २२१/२०१२**          **नि.क्र. ६३.**

अर्जुन पि. मच्छींद्र पुंड
वय– ३८ वर्ष, धंदा. शेती,
रा.वाहेगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.          ...... **वादी**.

**वि रु ध्द**

१. मच्छींद्र मंजाबापूर पुंड
वय ६१ वर्ष, धंदा–शेती

२. कमलबाई मच्छींद्र पुंड
वय ५९ वर्ष, धंदा. शेती

३. भिमराज मच्छींद्र पुंड
वय ३६ वर्ष, धंदा– शेती

४. योगिता भ्र. भिमराव पुंड
वय ३३ वर्ष, धंदा– शेती
सर्व रा. वाहेगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.          ... **प्रतिवादीं**

**दावा :– वाटप ताब्यासाठी**

---

वादीतर्फे – श्री. डी.के.तारु, विधिज्ञ.
प्रतिवादींतर्फे – श्री. ए.बी. पारधे, विधीज्ञ.

---

**– न्या य नि र्ण य –**

( दि. ०७ फेब्रुवारी २०१८ रोजी पारित )

१. प्रस्तुतचा दावा वाटप ताब्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. मौजे वाहेगाव ता. गंगापूर येथील (I) शेतजमिन गट नं. ३८६ क्षेत्र २ हेक्टर २ आर, (II)गट नं. ३८७ क्षेत्र २ हेक्टर, (III) गट नं. ३८७ मधील ३ गुंठे क्षेत्र, (IV) गट नं. ३८७ मधील सामायिक विहीर, (V) गट नं. ३८७ मधील एक आरसीसी घर क्षेत्र २८ बाय ३१ व दुसरे लोडबेरिंग घर क्षेत्र २२ बाय २२, (VI) सदर दोन्ही घरामागील दोन पत्र्यांच्या खोल्या क्षेत्र २० बाय १०, (VII) गट नं. ३८७ मधील विहिरीवरील विद्युत मोटार व पाईपलाईनमधील आठआणे हिस्सा आणि (VIII) कांद्याच्या चाळ्या अशा एकूण आठ मिळकती ह्या दावा मिळकती आहेत. सदर मिळकतींचा यापुढे संक्षेपासाठी **'दावा मिळकतीं'** असा उल्लेख केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, प्रतिवादी नं. ३ हा वादीचा सख्खा भाऊ असुन प्रतिवादी नं. १ व २ हे त्यांचे वडील आहेत. प्रतिवादी नं. ४ ही प्रतिवादी नं. ३ ची पत्नी आहे. दावा मिळकतीं ह्या वादी व प्रतिवादींच्या एकत्र हिंदू कुटूंबाच्या उत्पन्नातून घेतलेल्या मिळकती आहेत. दि. २२.०४.१९९१ रोजी वादी व प्रतिवादी नं. ३ यांच्या नावे गट नं. ३८७ मध्ये अनुक्रमे ३ एकर व २ एकर अशी शेती खरेदी करण्यात आली. सन २००६ मध्ये प्रतिवादी नं. २ च्या नावे गट नं. ३८६ मध्ये २ एकर शेती खरेदी करण्यात आली. दि. २९.०३.२००५ मध्ये वादी व प्रतिवादी नं. ४ यांच्या नावे गट नं. ३८६ मध्ये एक हेक्टर २१ आर शेती सामायिक खरेदी करण्यात आली. शेतजमीन गट नं. ३८७ मध्ये विहिर, पाईपलाईन व रस्त्याकरिता सन २००६ साली गंगाधर यशवंता शिंदे यांच्याकडून ३ गुंठे शेती सामायिक खरेदी करण्यात आली. कुटूंबाच्या सोयीसाठी दावा मिळकतीं हया वादी व प्रतिवादी नं. २ ते ४ यांच्या नावे करण्यात आल्या. दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा कायदेशीर हिस्सा आहे. सन १९९१ पासुन वादी, प्रतिवादी हे दावा मिळकतीं एकत्रीत कास्त करुन पिके घेत आलेली आहेत. त्यांचे एकत्रीत कुटूंब वाढल्याने व प्रतिवादी नं. ३ यांना मुलबाळ झाल्याने शेतातील कामधंद्यावरुन त्यांच्यात पटेनासे झाले. त्यामुळे वादी हा त्याच्या कुटूंबियासह प्रतिवादींपासून वेगळा राहत होता. वादी प्रतिवादीमध्ये पोलीस केस चालू असल्याने व वाद होत असल्याने दि. ०१.०४.२०१२ रोजी रामनवमीच्या दिवशी आलेल्या

पाहुण्यासमक्ष व प्रतिवादीं समक्ष वादीने त्याचा दावा मिळकतींमधील वाटप हिस्सा मागितला असता प्रतिवादींनी तुला एक गुंठाही देणार नाही अशी भाषा वापरल्याने वादीने प्रस्तुतचा दावा दावा मिळकतीच्या वाटप ताब्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्याचा योग्य तो आकार करुन वादीने त्यावर योग्य तो न्यायालयीन मुद्रांक दिलेला आहे. अशी कथने करुन दावा मिळकतीमधील वादीचा वाटप हिस्सा ताब्यात मिळण्याची विनंती वादीने केलेली आहे.

०३. प्रतिवादींनी दाव्यात हजर होऊन नि. क्र. २० वर त्यांची कैफियत दाखल केली. त्यामध्ये गट नं. ३८७ मध्ये वादी व प्रतिवादी नं. ३ यांची सामायिक विहिर असल्याची बाब व वादीसोबतचा नातेसंबध प्रतिवादींनी कबूल केलेला आहे. याव्यतिरिक्त वादीचा संपुर्ण दावा प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेला आहे. आपल्या अधिक निवेदनात प्रतिवादींनी असे सांगितले आहे की, प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी खरेदीखताने विकत घेतलेल्या मिळकतींशी वादीचा कोणताही संबंध नाही. वादी व प्रतिवादी नं. ४ यांनी बन्सी दर्यापूरकर यांच्याकडून दि. २९.०३.२००५ रोजी स्वःकष्टार्जित उत्पन्नातून खरेदीखताआधारे गट नं. ३८६ पैकी ३ एकर शेती खरेदी घेतली. वादी हा १ एकर १० गुंठे व प्रतिवादी नं. ४ ही १ एकर ३० गुंठे शेतीचे खरेदीखताने मालक व ताबेदार झाले. प्रतिवादी नं. ३ याने गट नं. ३८७ मध्ये ३ एकर जमीन खरेदीखताने दि. २२.०४.१९९१ रोजी शेख अनिस शेख अहमद यांच्याकडून विकत घेतली. प्रतिवादी नं. २ हिने गट नं. ३८६ मधील २ एकर शेती खरेदीखताने विकत घेतली. अशाप्रकारे वादी व प्रतिवादी यांनी स्वःकष्टाने शेतजमिनी विकत घेतलेल्या आहेत. केवळ त्रास देण्यासाठी वादीने दाखल केलेला दावा हा पंचवीस हजार रुपये भरपाई खर्चावर खारिज करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

०४. उभय बाजुंची अभिलेखावरील पक्षकथने, दाखल कागदपत्रे व युक्तीवादावरुन प्रस्तुत दाव्याच्या कामी माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांनी नि. २२ वर इंग्रजी भाषेमध्ये मुद्दे निश्चित केले. दि. २६.०८.२०१६ रोजी स्वःकष्टार्जित मिळकतीबाबतचा अतिरिक्त मुद्दा काढण्यात आला. सदरील मुद्दे मराठी भाषांतरांसह

व त्यावरील माझे कारणमिमांसेसह व निष्कर्षासह मी पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

| Sr.No. | Issues. | Findings |
|---|---|---|
| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
| 1 | Whether the plaintiff proves that the suit property is his ancestral joint Hindu Family property ? | Partly affirmative. |
| 1 | दावा मिळकती हया वादीच्या हिंदू एकत्र कुटूंबाच्या वडिलोपार्जित मिळकती असल्याचे वादीने शाबित केले आहे काय ? | अशंतः होकारार्थी. |
| 2 | What is the share of plaintiff in the suit property ? | 1/4th share in joiny Hindu family properties . |
| २. | वादीचा दावा मिळकतमध्ये हिस्सा कसा ? | एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती मध्ये १/४ हिस्सा. |
| 2-A | Do the defendant nos. 1 to 4 prove that suit properties are their self acquired properties ? | In the negative. |
| २-अ | प्रतिवादींनी दावा मिळकती त्यांच्या स्वसंपादित मिळकती असल्याचे शाबित केले आहे काय ? | नकारार्थी. |
| 3 | Whether the plaintiff is entitled for partition and separate possession of his share out of the suit property ? | In the negative. |
| ३ | वादी दावा मिळकतीमधील त्याचा हिस्सा वाटप पृथक करुन स्वतंत्र ताब्यात मिळण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| 4 | What order and decree ? | Suit stands dismissed. |
| ४. | अंतिम आदेश अथवा हुकूमनामा काय ? | दावा खारीज. |

**– <u>का र ण मि मां सा –</u>**

०५. दाव्याच्या पृष्ठयर्थ वादीने नि. क्र. २३ वर स्वतःची शपथेवर साक्ष दिलेली आहे. दावा मिळकत गट नं. ३८६ व ३८७ चे ७/१२ उतारे (नि.क्र.२४ ते २७ व ३३, ३४), फेरफार नं. ५३२५, ५४२३, १९९१, १९९२, ५३२७,

५२४२ चे उतारे (नि.क्र.२८ ते ३२), खरेदीखत दस्त नं. ११२९/२००५ (नि.क्र.४१), वादी व प्रतिवादी नं. ३ चे विद्यार्थी प्रवेश निर्गमप्रमाणे नोंदणी रजिस्टर उता–याच्या प्रती (नि.क्र. ५१ व ५२) अशी कागदपत्रे वादीतर्फे अभिलेखावर दाखल करण्यात आलेली आहेत. नि.क्र. ४२ वर वादीतर्फे पुरावा बंद पुरसिस देण्यात आलेली आहे. नि. क्र. ४३ वर प्रतिवादींतर्फे पुरावा बंद पुरसिस देण्यात आलेली आहे. त्यानंतर मुद्दा नं. २–अ हा अतिरीक्त मुद्या निश्चित करण्यात आला. अतिरिक्त मुद्दयावर वादीतर्फे कोणताही पुरावा देणे नसल्याबाबत नि.क्र. ५५ वर पुरसिस देण्यात आली. प्रतिवादींतर्फे नि. क्र. ५९ वर प्रतिवादी नं. ४ हिचा पुरावा अतिरिक्त मुद्दयावर नोंदविण्यात आला. त्यानंतर नि.क्र. ६० वर प्रतिवादींतर्फे पुरावा बंद पुरसिस देण्यात आली. उभयबाजुंचा युक्तीवाद ऐकला. अशा प्राप्त परिस्थितीत अभिलेखावरील प्राप्त पुराव्यावरुन माझे वरील मुद्यांवरील निर्णय खालीलप्रमाणे–

**मुद्दा क्रमांक १, २ व २–अ बाबत...**

०६. मुद्दा क्रमांक १,२ व २–अ हे एकमेकांशी निगडित असल्याने व त्यावर सारख्याच स्वरुपाचा पुरावा चर्चिला जाणार असल्याने ते माझ्या विचारार्थ येथे एकत्रीत घेतलेले आहेत. वादी विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीं ह्या एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकती आहेत. दावा मिळकतींपैकी घरांच्या व पत्र्याच्या खोल्यांच्या नोंदी झालेल्या नाहीत. सन १९९१ साली गट नं. ३८७ मधील शेती विकत घेण्यात आलेली आहे. त्यावेळी वादी व प्रतिवादी नं. ३ हे अज्ञान असल्याची बाब नि.क्र. ५१ व ५२ कडील विद्यार्थी प्रवेश निर्गमप्रमाणे नोंदणी रजिस्टर उता–यावरुन स्पष्ट होते. त्यामुळे गट नं. ३८७ मधील शेती ही एकत्र हिंदू कुटूंबाच्या उत्पनातून विकत घेतलेली शेती असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी नं. ३ भिमा यास कोणतेही स्वतंत्र उत्पन्न नव्हते. गट नं. ३८७ मधील विहिर ही सामायिक असल्याची बाब प्रतिवादींना मान्य आहे. गट नं. ३८६ चे खरेदीखत हे सामायिक खरेदीखत आहे. त्यामुळे वादीचा दावा हा मंजुर करण्यात यावा असा युक्तीवाद वादीतर्फे करण्यात आला.

०७. याउलट, प्रतिवादींचे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की,

दावा मिळकती ह्या वडिलोपार्जित असल्याचे वादीने शाबित केलेले नाही. खरेदीखतामधील क्षेत्र हे वेगवेगळे दाखविलेले आहेत. खरेदीखतामध्ये वादी व प्रतिवादी नं. ४ चे वय सज्ञान दाखविलेले आहे. नि.क्र. ५१ व ५२ कडील उतारे योग्य पध्दतीने शाबित करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे वादीचा दावा खारिज करण्यात यावा असा युक्तीवाद प्रतिवादींतर्फे करण्यात आला.

०८. उभयबाजुंच्या युक्तीवादानंतर अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता उभयबाजुंमध्ये दावा मिळकतीच्या स्वरुपाबाबतचा मुख्य वाद असल्याचे दिसुन येत आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीं हया एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकती आहेत. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती हया ज्याच्या त्याच्या स्वसंपादीत मिळकती आहेत.

०९. भारतीय पुरावा कायदा कलम १०१ प्रमाणे दावा मिळकती हया स्वसंपादीत असल्याच्या बाबी प्रतिवादींनी योग्य तो पुरावा देऊन शाबित करणे आवश्यक आहे. वादीने दावामिळकतीं वादी प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती असल्याचे त्याच्या पक्षकथनामध्ये व अभिलेखावरील पुराव्यात सांगीतलेले आहे. याउलट, दावामिळकती स्वसंपादित असल्याबाबत प्रतिवादीं नं. ४ हिने नि.क्र.५९ वर स्वतःची साक्ष दिलेली आहे. त्यामुळे दावामिळकती स्वसंपादित आहेत किंवा एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती आहेत हया बाबी पाहणे आवश्यक आहे.

१०. प्रतिवादी नं. ४ हिने तिच्या पुराव्यात तिचे लग्न सन २००० साली झाल्याचे सांगीतलेले आहे. प्रतिवादी नं. ४ ही वादीं व प्रतिवादींच्या कुटूंबामध्ये सन २००० साली आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे दावामिळकत गट नं. ३८७ मध्ये सन १९९१ साली खरेदी घेण्यात आलेल्या मिळकती हया स्वसंपादित आहेत ही बाब शाबीतेकामी प्रतिवादी योगीता हिचा पुरावा पुरेसा ठरतांना दिसून येत नाही. लग्नापुर्वी सासु – सासरे व भाया एकत्रीत राहत होते अशी कबुली साक्षीदार योगीता हिने तिच्या पुराव्यात दिलेली आहे. त्यामुळे सन २००० पुर्वी वादी व प्रतिवादींचे एकत्रीत कुटूंब असल्याची बाब स्पष्ट होते. तसेच नि.क्र. ५१ व ५२ कडील विदयार्थी प्रवेश नोंदणी

रजिष्टर उता–यावरुन सन १९९१ साली वादी व प्रतिवादी नं. ३ हे अज्ञान असल्याचे सकृतदर्शणी स्पष्ट होते. सन १९९१ साली वादी व प्रतिवादी नं. ३ हे अज्ञान असल्याबाबतची कबुली प्रतिवादींतर्फे वादीच्या उलट–तपासामध्ये आणण्यात आलेली आहे. यावरुन सन १९९१ साली वादी व प्रतिवादी नं.३ अज्ञान असतांना दावामिळकतीपैकी गट नं. ३८७ मधील शेती एकत्रीत घेण्यात आल्याचे सकृतदर्शणी स्पष्ट होते. तसेच प्रतिवादींना ईतर कोणतेही ठोस वैयक्तिक उत्पन्न असल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे दावामिळकतीपैकी गट नं. ३८७ मधील वादी व प्रतिवादी नं. ३ यांच्या नावे सन १९९१ साली घेण्यात आलेली मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत असल्याचे स्पष्ट होते.

११. दावामिळकत गट नं. ३८७ मध्ये एक आर.सी.सी. घर, एक लोड बेरींग घर, दोन पत्राच्या खोल्या व कांदयाच्या चाळी असल्याच्या बाबी प्रतिवादींतर्फे अभिलेखावर नाकारण्यात आलेल्या नाहीत. सदरची घरे, पत्राच्या खोल्या व कांदयाच्या चाळी स्वसंपादित अथवा स्वकष्टार्जीत असल्याबाबतचा कोणताही स्पष्ट व ठोस पुरावा प्रतिवादींतर्फे अभिलेखावर आणण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वर नमूद घरे, खोल्या व कांदयाच्या चाळी हया वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती असल्याचे स्पष्ट होते.

१२. गट नं. ३८७ मधील विहीर सामाईक असल्याची बाब वादग्रस्त नाही. सदरची विहीर स्वकष्टार्जीत असल्याबाबत प्रतिवादींतर्फे अभिलेखावर पुरावा आणलेला नाही. तसेच सदर विहीरीवरील विदयुत मोटार व पाईपलाईनमधील आठ आणे हिस्सा सुध्दा स्वकष्टार्जित असल्याबाबतचा ठोस पुरावा प्रतिवादींतर्फे अभिलेखावर आणण्यात आलेला नाही. त्यामुळे गट नं. ३८७ मधील सामाईक विहीर, त्यावरील विदयुत मोटार व पाईपलाईनमधील आठ आणे हिस्सा या मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती असल्याचे दिसून येते.

१३. गट नं. ३८६ मधील १ हे. २१ गुंठे शेती ही वादी व प्रतिवादी नं. ४ यांच्या नावे एकत्रीत खरेदी घेण्यात आल्याचे नि. ४१ कडील खरेदीखतावरुन दिसून

येते. सदर मिळकत खरेदीकामी प्रतिवादी नं.४ ने कशी रक्कम उभी केली याबाबतचा ठोस पुरावा अभिलेखावर दिसून येत नाही. सदर खरेदी क्षेत्र हे प्रतिवादी नं. ४ चे स्वसंपादित असल्याबाबतचा ईतर कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे गट नं. ३८६ मधील १ हे. २१ गुंठे शेती वादी व प्रतिवादी नं. ४ यांच्या नावे वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी घेतल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर विकत घेतलेले क्षेत्र हे वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत असल्याचे शाबित होते.

१४. गट नं. ३८६ मधील ८१ आर क्षेत्र प्रतिवादी नं. २ च्या नावे दि. २४.०१.२००६ रोजी संदिप गंगाधर शिंदे व भरत गंगाधर शिंदे यांच्याकडून विकत घेण्यात आल्याचे नि.क्र. ३१ वरील फेरफार नं. ५३२७ च्या उता–यावरुन दिसून येते. सदर शेती प्रतिवादी नं. २ ची स्वसंपादीत अथवा स्वकष्टार्जित शेती असल्याबाबत तिने स्वतः अभिलेखावर साक्ष दिलेली नाही. तसेच तिच्या वतीने कोणत्याही ईतर सक्षम साक्षीदाराची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी नं. २ हिच्या नावे घेण्यात आलेले क्षेत्र हे वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या उत्पन्नातून घेण्यात आल्याचे शाबीत होते.

१५. गट नं. ३८७ मध्ये प्रतिवादी नं. २ च्या नावे ३ गुंठे क्षेत्र सामाईक खरेदी केल्याचे वादीतर्फे सांगण्यात आलेले आहे. परंतु गट नं. ३८७ चा अभिलेखावरील नि. २७ वरील ७/१२ उतारा न्याहाळता प्रतिवादी नं. २ हिच्या नावे फक्त दिड गुंठा क्षेत्र विकत घेतल्याचे दिसून येत आहे. उर्वरीत दिड गुंठा क्षेत्र हे मंदाबाई लक्ष्मण जमधडे हिच्या नावे नमूद असल्याचे दिसून येत आहे. फेरफार नं. ५३२५ न्याहाळता गंगाधर यशवंत शिंदे याने त्याच्या मालकिच्या गट नं. ३८७ पैकी ४९ गुंठे शेतीपैकी ३ गुंठे क्षेत्रापैकी २ आर जमिनीतील स्वतंत्र विहीरीतील आठ आणे हिस्सा, विहिरीवरील विदयुत मोटारीतील आठ आणे हिस्सा व रस्त्यासाठी १ गुंठा शेती अशी एकूण ३ गुंठे शेती ही मंदाबाई जमधडे व कमलबाई पुंड यांना कायमस्वरुपी विक्री केल्याचे दिसून येत आहे. यावरुन संपूर्ण ३ गुंठे क्षेत्राची प्रतिवादी नं. २ कमलबाई मालक असल्याचे दिसून येत नाही. ती फक्त दिड गुंठा क्षेत्राची मालक

आहे . सदर दिड गुंठा क्षेत्र स्वसंपादित असल्याबाबतचा सक्षम पुरावा प्रतिवादींतर्फे अभिलेखावर देण्यात न आल्याने सदरील दिड गुंठा क्षेत्र हे सुध्दा वादी प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या उत्पन्नातून विकत घेतल्याचे स्पष्ट होते.

१६. वरील विवेचनाप्रमाणे दावामिळकतीपैकी प्रतिवादी कमलबाई हिच्या नावे फक्त दिड गुंठा क्षेत्र गट नं. ३८७ मध्ये असल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे दावामिळकतीमध्ये वादीने प्रतिवादी कमलबाई हिच्या नावे दिड गुंठा जादा क्षेत्र नमूद केल्याचे दिसून येत आहे. तसेच भारतीय पुरावा कायदा कलम १०१ प्रमाणे प्रतिवादी नं. २ ते ४ यांच्या नावे घेण्यात आलेल्या मिळकती हया त्यांच्या स्वसंपादित अथवा स्वकष्टार्जित असल्याच्या बाबी सक्षम पुरावा देवून त्यांनी शाबीत केल्या नसल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादी कमलबाई हिच्या नावे दावामिळकतीपैकी जादा नमूद केलेले दिड गुंठा क्षेत्र वगळता ईतर संपूर्ण दावामिळकती हया वादी व प्रतिवादीं यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी विधीज्ञ यांचा दावामिळकतीच्या स्वरुपाबाबत करण्यात आलेला युक्तीवाद हा ब–याचश्या अंशी योग्य व संयुक्तीक दिसून येत आहे. याउलट प्रतिवादीं विधीज्ञ यांनी दावामिळकती स्वसंपादित असल्याबाबत केलेल्या युक्तीवादामध्ये मला कोणतीही गुणवत्ता दिसून येत नाही.

१७. तोंडी अथवा लेखी वाटप झाले नसल्याची कबुली प्रतिवादी साक्षीदार योगीता हिने तिच्या उलट–तपासात दिलेली आहे. वरील विवेचनाप्रमाणे दावामिळकतीपैकी कमलबाई हिच्या नावे नमूद केलेले जादा दिड गुंठा क्षेत्र वगळता ईतर संपूर्ण दावामिळकती वादी व प्रतिवादीं यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती असल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. ४ हिच्या नावे गट नं. ३८६ मध्ये घेण्यात आलेली शेतीसुध्दा त्यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे दावामिळकतीपैकी प्रतिवादी कमलबाई हिच्या नावे नमूद दिड गुंठा जादा क्षेत्रापैकी ईतर संपूर्ण दावामिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना हिस्सा असल्याचे सकृतदर्शणी दिसून येते.

१८. मुल्ला हिंदू लॉ परिच्छेद क्र. ३१४ मध्ये खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

> *Para 314- **Wife.**(1) A wife cannot herself demand a partition. But if a partition does take place between her husand and his sons, she is entitled (except in southern India) to receive a share equal to that of a son and to hold and enjoy that share separately even from her husband.*

१९. वादी व प्रतिवादी नं. ३ हे प्रतिवादी नं. १ व २ यांची मुले आहेत. प्रतिवादी नं. २ ही प्रतिवादी नं. १ ची पत्नी आहे. त्यामुळे वरील परिच्छेद क्र. १४ चा विचार केला असता वादी, प्रतिवादी नं. १ व ३ यांच्यात वाटप होत असतांना प्रतिवादी नं. २ हिस तिच्या मुलाइतका हिस्सा वाटपात मिळेल. वादी, प्रतिवादी नं. १ व ३ हे सर्व वर्ग १ चे हिस्सेदार असल्याचे दिसून येत असल्याने त्यांना समान हिस्सा मिळेल. वरील परिच्छेद क्र. १४ प्रमाणे प्रतिवादी नं. २ हिस तिच्या मुलाइतका हिस्सा मिळेल. यावरुन वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना प्रत्येकी समान हिस्सा मिळेल. त्यामुळे वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना प्रत्येकी १/४ हिस्सा मिळेल. प्रतिवादी नं. ४ ही प्रतिवादी नं. ३ ची पत्नी असल्याने तिला कोणताही कायदयाप्रमाणे हिस्सा मिळणार नाही.

२०. वरील सर्व विवेचनाचा विचार केला असता वादीने प्रतिवादी नं. २ कमलबाई हिच्या नावे जादा नमूद केलेले दिड गुंठा क्षेत्र वगळता ईतर संपूर्ण दावामिळकत वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत असल्याचे शाबीत केल्याचे दिसून येत आहे. याउलट दावामिळकती स्वसंपादीत असल्याच्या बाबी प्रतिवादींनी योग्य तो पुरावा देवून शाबीत केलेल्या नाहीत. तसेच वरील विवेचनाप्रमाणे वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ यांना संबंधित त्यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकतीमध्ये प्रत्येकी १/४ वाटप हिस्सा मिळेल ही बाबसुध्दा स्पष्ट झाली आहे. यासर्व बाबींचा विचार करुन मी मुद्या क्र. १, २ व २-अ चे उत्तर अनुक्रमे अशंतः होकारार्थी, एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकतीमध्ये १/४ हिस्सा व नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ३ बाबत**

२१. वादीने दावामिळकतीमध्ये दिड गुंठा क्षेत्र प्रतिवादी नं. २ च्या नावे जादा नमूद केलेले आहे. वादीने दावामिळकतीच्या चतुःसिमा वादपत्रात नमूद केलेल्या नाहीत. तसेच घराबाबतचे मिळकत उतारे अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. यावरुन दावामिळकतीपैकी एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकतींचे योग्य व सुस्पष्ट वर्णन वादीने अभिलेखावर आणलेले नाही हे स्पष्ट होते. तसेच दावामिळकतीपैकी घरमिळकती, पत्रांच्या खोल्यांबाबतचे, विदयुत मोटारीचे, पाईपलाईनचे आणि कांदयाच्या चाळीचे मुल्यांकन करुन त्यावर योग्य तो न्यायालयीन मुद्रांकही वादीने दिल्याचे दिसून येत नाही. दावामिळकतीमध्ये कांदयाच्या चाळया असे मोघमपणे नमूद केलेले आहे. कांदयाच्या चाळया किती आहेत व त्याचे आकारमान काय आहे याबाबत वादीने कोणतेही स्पष्ट विवरण अभिलेखावर आणलेले नाही. घरमिळकतीच्या चतुःसिमा अभिलेखावर वादीतर्फे आणण्यात आलेल्या नाहीत. प्रतिवादी नं. २ च्या नावे असलेल्या दिड गुंठा क्षेत्राच्या चतुःसिमासुध्दा अभिलेखावर नमूद नाहीत. त्यामुळे दावामिळकतींच्या नेमक्या स्थानाबाबत स्पष्टपणे बोध होत नाही. यासर्व बाबींचा विचार केला असता वाटपाबाबत अंमलबजावणीयोग्य हुकूमनामा पारीत करता येणार नाही. त्यामुळे वादीचा वाटप हिस्सा या टप्प्यावर पृथक करुन ताब्यात देता येणार नाही. त्यामुळे तो त्याचा वाटप हिस्सा पृथक करुन ताब्यात मिळण्यास पात्र नसल्याचे दिसून येते. त्यामुळे यासर्व बाबींचा विचार करुन मी मुद्या क्र. ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ बाबत**

२२. वरील विवेचनाप्रमाणे वादीने दावामिळकतीपैकी एकत्र हिंदु कुटूंबाची मिळकत शाबीत केली असून त्यामध्ये त्याचा १/४ वाटप हिस्सा असल्याची बाब स्पष्ट झालेली आहे. परंतु दावामिळकतीचे योग्य व सुस्पष्ट वर्णन व स्थान वादीने शाबीत न केल्याने वादी या टप्प्यावर वाटप मिळण्यास पात्र नसल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे वादीचा दावा हा खारीज होण्यास पात्र आहे. वादीचा दावा हा दावामिळकतीचे वर्णन व स्थान शाबीत न झाल्याने खारीज होत आहे. त्यामुळे

वादीचा दावा खोटा होता असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादीवर कोणताही खर्च बसविणे उचित ठरेल असे मला वाटत नाही. याउलट उभय बाजुमधील नातेसंबंधाचा विचार केला असता दाव्याचा खर्च उभय बाजुंनी आपआपला सोसाण्याबाबतचा आदेश पारीत करणे उचित ठरेल असे मला वाटते. यासर्व बाबींचा विचार करुन मी मुद्या क्र. ४ कामी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. दावा खारीज करण्यात येतो.

२. उभय बाजुंनी आपआपला खर्च सोसावा.

३. येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा तयार करण्यात यावा.

स्वाक्षरी/–

दिनांक ०७.०२.२०१८

(भागवत तु. झिरपे)
सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
ता. गंगापूर जि. औरंगाबाद

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rajesh R. Deshpande. |
| Court | : | Jt. Civil Judge (J.D.),<br>Gangapur. |
| Date | : | 07.02.2018 |
| Judg. signed by the Presiding Officer on | : | 07.02.2018 |
| Judgment uploaded on | : | 07.02.2018 |